Office of The Divisional Forest Officer,
Mumbai Mangrove Conservation Unit
SRA Building, A wing, 2nd Floor,
Anant Kanekar Marg,
Bandra (E) Mumbai- 400 051.
Phone / Fax .022-26591586

विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक, यांचे कार्या...
एस आर ए बिल्डीग ए -विंग, दुसरा मजला,
अनंत कानेकर मार्ग,
बांद्रा (पु),मुंबई – ४०० ०५१.
Email:-dfommcu@gmail.com

1st meeting

विषय : विभागीय आयुक्त,कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची बैठक दि. 04/11/2016.

जा.क्र.विवअ/मुकांसंघ/सभा /1044/2016-17
बांद्रा, दिनांक: 21 /11/2016

प्रति,

1. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग
2. मा. मुख्य वनसंरक्षक ,कांदळवन कक्ष , मुंबई.
3. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे / पालघर / रायगड / रत्नागिरी/ सिंधुदुर्ग.
4. मा. पोलिस आयुक्त, मुंबई / ठाणे यांचे प्रतिनिधी
5. मा. संचालक पर्यावरण विभाग.
6. मा. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा-भाईंदर / वसई - विरार / कल्याण - डोंबिवली / भिवंडी निझामपुर/ उल्हासनगर.
7. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकिय संस्था.
8. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
9. नगर रचना विभागाचे अधिकारी/ CIDCO यांचे प्रतिनिधी
10. डॉ. महेश शिंधीकर, Applied dept. of Science, College of Engineering pune
11. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.

उपरोक्त विषयान्वये नवी मुंबईतील कांदळवन संरक्षणासाठी नियुक्त केलेल्या संनियंत्रण समितीची बैठक दिनांक 04/11/2016 रोजी दुपारी 12.30 वाजता मा. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली जुने सचिवालय, मुंबई येथे घेण्यात आली. सदर बैठकीचे मंजुर इतिवृत्त माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात येत आहे त्याबाबतचा अनुपालन अहवाल पुढील बैठकीत सादर करावा, ही विनंती.

सदर समितीसाठी आपल्या विभागाने निवडलेल्या नोडल ऑफिसरची नावे दि. 25/11/2016 रोजी अखेर कळवावी. या बाबत मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका 87/2013 ची सुनावणी असल्याने यास प्रथम प्राधान्य द्यावे हि विनंती.

(एम. एम. पंडितराव)
सदस्य सचिव पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक मुंबई कांदळवन कक्ष.

विभागीय आयुक्त,कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण विभागातील
वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची बैठक
दि. 04/11/2016.

समितीची पहिली बैठक दिनांक 04/11/2016 रोजी दुपारी 12.30 वाजता विभागीयआयुक्त कोकण विभाग , यांचे जुने सचिवालय मुंबई येथे घेण्यात आली. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीस खालील अधिकारी व व्यक्ती उपस्थित होत्या.

1. श्री . प्रभाकरजी देशमुख विभागीय आयुक्त, कोकण विभाग. अध्यक्ष.
2. श्री. एस. वासूदेवन , मुख्य वनसंरक्षक ,कांदळवन कक्ष , मुंबई . सदस्य.
3. श्री. डॉ. अश्विनी जोशी , जिल्हाधिकारी , मुंबई. सदस्य.
4. श्री. दिपेंद्र सिंह कुशवाह , जिल्हाधिकारी मुंबई उपनगर. सदस्य.
5. श्री. अभिजीत बांगर , जिल्हाधिकारी पालघर. सदस्य.
6. श्री. डॉ भाऊसाहेब दांगडे उपआयुक्त (महसूल), कोकण विभाग. सदस्य.
7. श्री. संदीप मोटेगावकर , क्षेत्र अधिकारी , म. प्र. नि. मंडळ प्रादेशिक कार्यालय, मुंबई. सदस्य.
8. श्री. रमेश बा. घडवले, सहाय्यक पोलीस आयुक्त (समन्वय) पोलीस आयुक्त मुंबई यांचकरिता
9. श्री. भरत शितोळे , उपविभागीय अधिकारी पनवेल प्रतिनिधी जिल्हाधिकारी रायगड सदस्य प्रतिनिधी.
10. श्री. वंदना सुर्यवंशी , निवासी उपजिल्हाधिकारी ठाणे. सदस्य प्रतिनिधी.
11. श्री.एस . के. खेडेकर , नायब तहसिलदार ( महसुल). सदस्य प्रतिनिधी.
12. श्री. एम. एम. पंडितराव , विभागीय वन अधिकारी ,मुंबई कांदळवन संधारण घटक. सदस्य सचिव.

समितीचे सदस्य यांनी मा. अध्यक्ष यांच्या वतीने सर्व सदस्यांचे स्वागत केल्यानंतर दि.04/11/2016. रोजी झालेल्या बैठकीतील मुद्यांबाबत चर्चा करण्यात आली. बैठकी चर्चा झालेले मुद्दे व करावयाची कार्यवाही यांचा थोडक्यात तपशील पुढीलप्रमाणे

| अ.क्र | मुद्दा | करावयाची कार्यवाही/निर्णय | यंत्रणा |
|---|---|---|---|
| 1 | ब्रिफ डॉक्युमेंट तयार करणे. | याबाबत पर्यावरण विभागाच्या सूचनाप्रमाणे, 500 हेक्टरवरील पाणथळ जागा असल्यास त्याचे ब्रिफ डॉक्यूमेंट तयार करून पर्यावरण विभागास सादर करावे. | जिल्हाधिकारी सर्व दि.21/11/2016 पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | वनविभागाने तयार केलेल्या डॉकयूमेंटपैकी ब्रिफ डॉक्यूमेंटची एखादया स्थळाची प्रत जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करून देणे. | वनविभागाने तयार केलेल्या डॉकयूमेंटपैकी ब्रिफ डॉक्यूमेंटची एखादया स्थळाची प्रत जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करून देणे. | मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष दि.10/11/2016 पर्यंत |
| 3 | पाणथळ जमिनीबाबत येणाऱ्या तक्रारी स्वीकारणे व त्या पुढील कार्यवाही करणे व त्यास व्यापक प्रसिध्दी देणे . | 1 स्वतंत्र वेबसाईट उघडण्यास कालावधी लागणार असल्याने याबाबत महसूल व वनविभागाच्या उपलब्ध ई-मेल आयडीवर जनतेच्या तक्रारी स्वीकारण्यात याव्यात.<br>2 जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये लोकशाही दिनानिमित्त या तक्रारी स्विकाराव्यात. | सदर शासन निर्णयातील पूर्तता करण्यात यावी.<br><br>जिल्हाधिकारी सर्व संबधित पोलीस अधिकारी |
| 4 | जनहित याचिका 87/2013 मा. उच्च न्यायालयाच्या अंमलबजावणीसाठी मा. न्यायालय अंतरिम निर्णयातील अंमजबजावणी करावयाच्या आदेशांची यादी तयार करणे. | सदर आदेशांची यादी तयार करावी व सर्वांना कळवावी. | समिती सचिव |
| 5 | नियुक्त विभागांचे जबाबदार अधिकारी/ नोडल ऑफिसर कळवणेबाबत संबधित विभागांना पत्र लिहिणे. | सदर संबधित सर्व विभागांना पत्र लिहिणे.<br><br>आज रोजी बरेच सदस्य गैरहजर असल्याने मा. अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली. तसेच उपस्थित राहणारे प्रतिनिधी अधिकारी किमान उपायुक्त दर्जापेक्षा कमी असतील याची दक्षता संबंधित विभागाने घ्यावी व त्यांची नावे व पदनामे पुढील 8 दिवसात कळवावीत. | समिती सचिव<br><br>संबंधित विभाग |

याबाबत याच महिन्यात पुन्हा बैठक बोलावण्याच्या सूचना देउन व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

विभागीय आयुक्त
कोकण विभाग तथा अध्यक्ष नवी मुंबई
कांदळवन संरक्षण सनियंत्रण समिती

प्रतिलिपी:- वरील सदस्य सर्व.